**L. A. BILL No. LXV OF 2025.**

A BILL

TO PROVIDE FOR ESTABLISHMENT OF THE GADCHIROLI DISTRICT MINING AUTHORITY FOR THE PURPOSES OF CO-ORDINATING AND SUPERVISING ORDERLY AND RAPID DEVELOPMENT OF THE MINERAL BEARING AREAS IN THE GADCHIROLI DISTRICT AND EXECUTING PLANS, PROJECTS AND SCHEMES FOR SUCH DEVELOPMENT AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६५.**

**गडचिरोली जिल्ह्यातील खनिजयुक्त क्षेत्रांच्या सुव्यवस्थित व जलद विकासाचे सुसूत्रीकरण व पर्यवेक्षण करण्याच्या आणि अशा विकासासाठी परियोजना, प्रकल्प व योजना राबविण्याच्या प्रयोजनांसाठी गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरणाची स्थापना करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, गडचिरोली जिल्ह्यातील खनिजयुक्त क्षेत्रांच्या सुव्यवस्थित व जलद विकासाचे सुसूत्रीकरण व पर्यवेक्षण करण्याच्या आणि अशा विकासासाठी परियोजना, प्रकल्प व योजना राबविण्याच्या प्रयोजनांसाठी गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरणाची स्थापना करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २ जून २०२५ रोजी गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण अध्यादेश, २०२५, प्रख्यापित केला होता ; २०२५ चा महा. अध्या. ४.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

संक्षिप्त नाव, प्रारंभ, विस्तार व प्रयुक्ती.

**१.** (१) या अधिनियमास, गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २ जून २०२५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(३) तो, गडचिरोली जिल्ह्याच्या क्षेत्रास लागू असेल.

(४) तो, प्रमुख खनिजांना व विनिर्दिष्ट गौण खनिजांना लागू असेल.

व्याख्या.

**२.** (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,-

(क) “प्राधिकरण” याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये स्थापन केलेले प्राधिकरण, असा आहे ;

(ख) “महामंडळ” याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, असा आहे ;

(ग) “संचालनालय” याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या अंतर्गत असलेले भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय , असा आहे ;

(घ) “कार्यकारी समिती” याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ९ अन्वये घटित केलेली कार्यकारी समिती, असा आहे ;

(ङ) “शासन” किंवा “राज्य शासन” याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(च) “खाण व खनिज अधिनियम” याचा अर्थ, खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७, असा आहे ; १९५७ चा ६७.

(छ) “खनिजे” यात, खनिज तेलांखेरीज सर्व खनिजांचा समावेश होतो ;

(ज) “खनिजयुक्त खंड” याचा अर्थ, खाणकाम भाडेपट्टा, पूर्वेक्षण लायसन व समन्वेषण लायसन यांसारख्या खनिज सवलतींच्या विकासासाठी खनिज (खनिज घटकांचा पुरावा) नियम, २०१५ याच्या तरतुदींन्वये खाणपट्टे किंवा पूर्वेक्षण लायसन यांसाठी तयार केलेले क्षेत्र, असा आहे ;

(झ) “खनिजयुक्त क्षेत्राचा विकास” याचा, त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह अर्थ, खाणपट्टा, पूर्वेक्षण लायसन, खनिज समन्वेषण लायसन, संलग्न खाणकाम कार्य व इतर तत्सम कार्ये यांसाठी खनिजयुक्त क्षेत्रांमधील विकास, असा आहे ;

(ञ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ट)" विनियम" याचा अर्थ, या अधिनियमान्वये प्राधिकरणाने केलेले विनियम, असा आहे ;

(ठ) " विनिर्दिष्ट गौण खनिजे " याचा अर्थ, चुनखडी, लाइमशेल, बेंटोनाइट, फुलरची माती किंवा केंद्र सरकारद्वारे **शासकीय राजपत्रात,** वेळोवेळी, विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी इतर खनिजे

ज्यांचे मर्यादा मूल्य भारतीय खाण ब्यूरोने निर्दिष्ट केलेल्या मर्यादा मूल्यापेक्षा कमी आहे, अशी खनिजे, असा आहे.

(२) या अधिनियमात वापरलेले, परंतु, त्यात व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, खाण व खनिज अधिनियमामध्ये आणि त्याअन्वये केंद्र सरकारने व महाराष्ट्र शासनाने केलेल्या नियमांमध्ये जे अर्थ नेमून दिलेले असतील, तेच अर्थ असतील.

प्राधिकरणाची स्थापना.

**३.** राज्य शासन, अधिनियमान्वये त्याच्याकडे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्याला नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण म्हणून संबोधले जाणारे प्राधिकरण, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे स्थापन करील.

प्राधिकरणाची रचना.

**४.** (१) प्राधिकरण, पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल :—

| | | |
|---|---|---|
| (एक) | मुख्यमंत्री | अध्यक्ष ; |
| (दोन) | मुख्यमंत्र्यांनी नामनिर्देशित करावयाचा एक मंत्री | सह-अध्यक्ष ; |
| (तीन) | मुख्यमंत्र्यांनी नामनिर्देशित करावयाचा एक मंत्री | उपाध्यक्ष ; |
| (चार) | मुख्यमंत्र्यांनी नामनिर्देशित करावयाचे दोन मंत्री | पदसिद्ध सदस्य ; |
| (पाच) | मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | पदसिद्ध सदस्य ; |
| (सहा) | सचिव (खनिकर्म), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग | पदसिद्ध सदस्य ; |
| (सात) | सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग | पदसिद्ध सदस्य ; |
| (आठ) | सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग | पदसिद्ध सदस्य ; |
| (नऊ) | सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग | पदसिद्ध सदस्य ; |
| (दहा) | सचिव, वित्त विभाग | पदसिद्ध सदस्य ; |
| (अकरा) | सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग | पदसिद्ध सदस्य ; |
| (बारा) | सचिव (महसूल), महसूल व वन विभाग | पदसिद्ध सदस्य ; |
| (तेरा) | सचिव (वने), महसूल व वन विभाग | पदसिद्ध सदस्य ; |
| (चौदा) | महासंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय | पदसिद्ध सदस्य ; |
| (पंधरा) | जिल्हाधिकारी, गडचिरोली जिल्हा | पदसिद्ध सदस्य ; |
| (सोळा) | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित. | सदस्य-सचिव. |

(२) प्राधिकरण, कोणत्याही बाबीवर किंवा बाबींवर त्यास सहाय्य करण्याच्या किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी विशेष निमंत्रित म्हणून त्याच्या बैठकीस किंवा बैठकींना उपस्थित राहण्यासाठी शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास बोलावू शकेल. अशा प्रकारे निमंत्रित केलेला अधिकारी, प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये भाग घेऊ शकेल, परंतु, त्यास मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.

(३) एखादी व्यक्ती, ज्याच्या आधारे तिची अशा प्रकारे नियुक्ती करण्यात आली आहे, ते पद, पदनाम किंवा यथास्थिति, अधिकारपद धारण करण्याचे बंद झाल्यावर, शक्य तितक्या लवकर, प्राधिकरणाचा सदस्य म्हणून पद धारण करण्याचे बंद करील आणि अशी व्यक्ती, प्राधिकरणाचा सदस्य असण्याचे अशा प्रकारे बंद झाले असल्याचे, तेव्हापासून एक आठवड्याच्या आत, अध्यक्षाला लेखी कळवील.

(४) महामंडळाचा व्यवस्थापकीय संचालक हा, प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी असेल आणि तो, प्राधिकरण निदेश देईल अशा अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील.

**प्राधिकरणाच्या बैठकी.**

**५.** (१) प्राधिकरण, प्रत्येक वर्षामध्ये किमान तीन वेळा बैठक घेईल आणि लागोपाठच्या दोन बैठकींमध्ये चार महिन्यांपेक्षा अधिक कालावधी असणार नाही आणि ते बैठकींमध्ये निर्धारित करील अशा कार्यपद्धतीच्या नियमांचे पालन करील.

(२) प्राधिकरणाची बैठक, नागपूर येथे किंवा अध्यक्ष ठरवील अशा अन्य ठिकाणी घेण्यात येईल.

(३) बैठकीची गणपूर्ती, अध्यक्षासह किमान नऊ सदस्य इतकी असेल.

**प्राधिकरणाची उद्दिष्टे.**

**६.** प्राधिकरणाची उद्दिष्टे, पुढीलप्रमाणे असतील :-

(क) गडचिरोली जिल्ह्यामधील प्रमुख व विनिर्दिष्ट गौण खनिज खंडांचा विकास करण्याची प्रक्रिया जलदगतीने करणे;

(ख) विविध खनिज सवलती धारक आणि खनिज आधारित उद्योग यांमध्ये समन्वय साधणे;

(ग) अल्ट्रा मेगा स्टील प्लांट उभारणे सुकर करणे आणि त्यांना लोहखनिजाच्या कच्च्या मालाचा पुरवठा करण्याची सुनिश्चिती करणे ;

(घ) गडचिरोली जिल्ह्याचा पोलाद केंद्र (स्टील हब) म्हणून विकास करणे ;

(ङ) गडचिरोली जिल्ह्यामध्ये खाणकाम आधारित उद्योग उभारण्यासाठी व त्यांना सुविधा पुरविण्यासाठी उपाययोजना करणे ;

(च) गडचिरोली जिल्ह्यामधील खाणकाम प्रकल्पांवर संनियंत्रण करणे.

**कृती किंवा कार्यवाही योग्य व वैध असल्याचे गृहीत धरणे.**

**७.** प्राधिकरणाची किंवा कार्यकारी समितीची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, प्राधिकरणातील किंवा कार्यकारी समितीतील, केवळ पद रिक्त असल्याच्या अथवा अध्यक्ष किंवा सह-अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा सदस्य म्हणून काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या नियुक्तीत कोणताही दोष असल्याच्या कारणावरून जर अशी कृती किंवा कार्यवाही ही, अन्यथा या अधिनियमाच्या तरतुदींनुसार असेल तर, अविधिग्राह्य ठरणार नाही.

**प्राधिकरणाचे अधिकार व कार्ये.**

**८.** प्राधिकरण पुढील अधिकारांचा वापर करील व पुढील कार्ये पार पाडील :—

(क) खाण व खनिज अधिनियम आणि त्यान्वये केलेले नियम यांनुसार, गडचिरोली जिल्ह्यामधील प्रमुख व विनिर्दिष्ट गौण खनिजांचा सुरळीतपणे व जलदगतीने पद्धतशीर विकास करणे ;

(ख) खाण व खनिज अधिनियम, खनिज सवलत नियम, १९६०, खनिज (लिलाव) नियम, २०१५ आणि केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने केलेले इतर नियम यांच्या तरतुदींचे अनुपालन केल्याची सुनिश्चिती करणे ;

(ग) खाणी कार्यान्वित करण्याच्या प्रक्रियेस गती देणे ;

(घ) सर्व संबंधित विभाग आणि यशस्वी बोलीदार यांच्या समन्वयाने खनिज खंडांच्या विकासासाठी आणि खनिज आधारित उद्योग उभारण्यासाठी परवानग्या मिळविण्याची प्रक्रिया शीघ्रतेने करणे ;

(ङ) गडचिरोली जिल्ह्यातील लिलाव केलेले खंड आणि महामंडळाला वाटप केलेले खंड यांचा समावेश असलेल्या खाणी जलद गतीने कार्यान्वित करण्यासाठी सर्व महत्त्वाच्या प्रमुख खनिज प्रकल्पांचे आणि विनिर्दिष्ट गौण खनिज प्रकल्पांचे पुनर्विलोकन करणे व संनियंत्रण करणे ;

(च) गडचिरोली जिल्ह्यातील खाणकाम विकासासाठी योजना तयार करणे व त्यांचे पुनर्विलोकन करणे ;

(छ) संचालनालयाच्या तांत्रिक शिफारशीनुसार, लिलावासाठी प्रस्तावित केलेले गडचिरोली जिल्ह्यातील प्रमुख खनिज खंड व विनिर्दिष्ट गौण खनिज खंड यांची तपासणी करणे व शिफारस करणे आणि यशस्वीरीत्या लिलाव केलेल्या अशा खंडांचे कालबध्द रीतीने केलेल्या कार्यान्वयनाचे नियतकालाने संनियंत्रण करणे ;

(ज) केंद्र सरकारने, महामंडळासाठी लोह खनिज क्षेत्र आरक्षित केल्यानंतर, लोह खनिज खंड विकसित करून, खाण विकासक-नि-परिचालक (एमडीओ) याच्या मार्फत, गडचिरोली जिल्ह्यातील पोलाद कारखान्यांना (स्टिल प्लान्ट्स) लोह खनिजाचा पुरेसा पुरवठा करण्यात येत असल्याची सुनिश्चिती करणे ;

(झ) गडचिरोली जिल्ह्यातील खाणकाम क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी, राज्य शासनाद्वारे कार्यवाही करणे आवश्यक असणारी किंवा राज्य शासनाद्वारे ज्याला असे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत अशा इतर कोणत्याही प्राधिकरणाद्वारे कार्यवाही करणे आवश्यक असणारी कोणतीही बाब किंवा प्रस्ताव यांची राज्य शासनाकडे शिफारस करणे ;

(ञ) प्रकल्पांमुळे व योजनांमुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींना पर्यायी निवासस्थाने पुरविण्यासाठी व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी योजना तयार करणे व त्यांची अंमलबजावणी करणे ;

(ट) विहित करण्यात येतील असे इतर कोणतेही अधिकार व कार्ये.

कार्यकारी समितीची रचना.

**९.** (१) पुढील सदस्यांचा समावेश असलेली प्राधिकरणाची एक कार्यकारी समिती असेल :-

| | | |
|---|---|---|
| (एक) | मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | अध्यक्ष ; |
| (दोन) | सचिव (खनिकर्म), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग | पदसिद्ध सदस्य ; |
| (तीन) | सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग | पदसिद्ध सदस्य ; |
| (चार) | सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग | पदसिद्ध सदस्य ; |
| (पाच) | सचिव (महसूल), महसूल व वन विभाग | पदसिद्ध सदस्य ; |
| (सहा) | सचिव (वने), महसूल व वन विभाग | पदसिद्ध सदस्य ; |
| (सात) | सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग | पदसिद्ध सदस्य ; |
| (आठ) | सचिव, वित्त विभाग | पदसिद्ध सदस्य ; |
| (नऊ) | महासंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय | पदसिद्ध सदस्य ; |
| (दहा) | जिल्हाधिकारी, गडचिरोली जिल्हा | पदसिद्ध सदस्य ; |
| (अकरा) | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित. | सदस्य-सचिव. |

(२) कार्यकारी समिती, कोणत्याही बाबीवर किंवा बाबींवर तिला सहाय्य करण्याच्या किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी विशेष निमंत्रित म्हणून तिच्या बैठकीला किंवा बैठकींना उपस्थित राहण्यासाठी शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्याला बोलावू शकेल. अशा प्रकारे निमंत्रित केलेला अधिकारी, समितीच्या कामकाजामध्ये भाग घेऊ शकेल, परंतु, त्यास मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.

(३) कार्यकारी समिती, तिच्या अध्यक्षाकडून निर्धारित करण्यात येईल अशा ठिकाणी व अशा वेळी बैठक घेईल, आणि ती तिच्या बैठकींमध्ये निर्धारित करील अशा कार्यपध्दतीविषयक नियमांचे पालन करील.

(४) कार्यकारी समितीस, याबाबतीत, वेळोवेळी असा निदेश देता येईल की, या अध्यादेशाच्या तरतुदींद्वारे किंवा त्यान्वये तिला प्रदान केलेले कोणतेही अधिकार किंवा तिला नेमून दिलेली कोणतीही कार्ये, महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकाकडून वापरण्यात येतील किंवा पार पाडण्यात येतील.

कार्यकारी समितीचे अधिकार व कार्ये.

**१०.** प्राधिकरणाच्या पर्यवेक्षणाच्या अधीन राहून, कार्यकारी समिती, पुढील अधिकारांचा वापर करील आणि पुढील कार्ये पार पाडील:-

(क) महामंडळासाठी आरक्षित केलेले खनिज खंड कार्यान्वित करण्यासाठी निविदांच्या अटी व शर्ती निश्चित करणे व खाण विकासक-नि-परिचालक (एमडीओ) नियुक्त करण्यासाठी निविदा मंजूर करणे;

(ख) प्राधिकरणाद्वारे तिच्याकडे सोपविण्यात येतील असे इतर कोणतेही अधिकार व कार्ये.

कार्यवाहीचे अधिप्रमाणन.

**११.** प्राधिकरणाच्या किंवा यथास्थिति, कार्यकारी समितीच्या अध्यक्षाच्या अथवा याबाबतीत प्राधिकरणाच्या किंवा कार्यकारी समितीच्या अध्यक्षाने प्राधिकृत केलेल्या त्याच्या कोणत्याही सदस्याच्या स्वाक्षरीने प्राधिकरणाच्या व कार्यकारी समितीच्या सर्व कार्यवाह्या, अधिप्रमाणित करण्यात येतील आणि प्राधिकरणाचे इतर सर्व आदेश व संलेख प्राधिकरणाच्या किंवा कार्यकारी समितीच्या सदस्य-सचिवाकडून अधिप्रमाणित करण्यात येतील.

खाण व खनिज अधिनियम आणि नियम यांचे अनुपालन.

**१२.** प्राधिकरण व कार्यकारी समिती, या अधिनियमान्वये अधिकार वापरताना आणि कार्ये पार पाडताना, खाण व खनिज अधिनियमाचे आणि त्या अन्वये केलेल्या नियमांचे अनुपालन करण्यास बांधील असेल.

विवरणे, अहवाल, इत्यादी मागविण्याचा प्राधिकरणाचा अधिकार.

**१३.** प्राधिकरणास व कार्यकारी समितीस, या अधिनियमान्वये, किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये तिच्या अधिकारांचा वापर करताना आणि तिची कार्ये पार पाडताना, तिच्याकडून मागविण्यात येईल असे, कोणतेही विवरण, लेखा विवरणपत्र, अहवाल, सांख्यिकी किंवा इतर माहिती, गडचिरोली जिल्ह्यातील शासकीय कार्यालये किंवा प्राधिकरणे यांच्याकडून मागविण्याचा अधिकार असेल, आणि अशी कार्यालये किंवा प्राधिकरणे अशी माहिती सादर करण्यास बांधील असतील.

अधिकार सोपविणे.

**१४.** प्राधिकरणास, या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये त्याच्याकडून वापरण्यायोग्य असलेले कोणतेही अधिकार किंवा त्याने करावयाचे कोणतेही कार्य विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटी व शर्तींना अधीन राहून, कार्यकारी समितीस किंवा महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकास प्रदान करता येतील.

सद्भावनापूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

**१५.** या अधिनियमान्वये सद्भावनापूर्वक केलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल किंवा करण्यात आलेल्या कोणत्याही कृतीबद्दल, या अधिनियमान्वये घटित केलेल्या प्राधिकरणाच्या किंवा कार्यकारी समितीच्या कोणत्याही सदस्याविरुद्ध कोणताही दावा, खटला दाखल करता येणार नाही किंवा कायदेशीर कारवाई करण्यात येणार नाही.

प्राधिकरणाचा खर्च.

**१६.** प्राधिकरणाचा आणि कार्यकारी समितीचा खर्च, महामंडळ आणि संचालनालय यांच्याकडून करण्यात येईल.

नियम करण्याचा अधिकार.

**१७.** ( १ ) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

( २ ) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनांत मिळून, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, सत्रासीन असताना, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने मांडण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, जर कोणत्याही नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल, आणि तशा अर्थाचा त्यांचा निर्णय, **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, असा निर्णय **शासकीय राजपत्रात,** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

विनियम करण्याचा अधिकार.

**१८.** प्राधिकरणास, शासनाच्या पूर्वमान्यतेने, या अधिनियमान्वये तरतूद केलेल्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी आणि सर्वसाधारणपणे, या अधिनियमाखालील त्याच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्याची कार्ये पार पाडण्यासाठी प्राधिकरणाच्या मते ज्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे अशा अन्य सर्व बाबींकरिता, या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे विनियम, वेळोवेळी, विनियमांद्वारे, करता येतील.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**१९.** ( १ ) जर या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवली तर, शासनास, प्रसंग उद्‌भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईलः

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

( २ ) पोट-कलम ( १ ) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ याचे निरसन व व्यावृती.

**२०.** (१) गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण अध्यादेश, २०२५ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

२०२५ चा महा. अध्या. ४.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्याच्या पूर्वेकडील भागात वसलेला गडचिरोली जिल्हा, लोह खनिज संपत्ती, हेमॅटाइट, मॅग्नेटाइट, बी.एच.क्यू., चुनखडी, डोलोमाइट, कोळसा, इत्यादींसारख्या मुबलक खनिजांनी संपन्न आहे. विविध वस्तूनिर्मिती उद्योगांसाठी कच्चा माल म्हणून अशा खनिजांचा वापर केला जातो. गडचिरोली जिल्हा लोह खनिजाने समृद्ध असल्याने, खनिज आधारित उद्योगांचे, विशेषतः, पोलाद उद्योगांचे केंद्र म्हणून विकसित करण्याची त्याची क्षमता आहे.

२. खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) आणि त्याअन्वये केलेले नियम, खाणींचा व खनिजांचा विकास व विनियमन यांचे नियमन करतात. खनिज (लिलाव) नियम, २०१५ अनुसार प्रमुख खनिज खंडांचा लिलाव केला जातो. खाणकाम सवलत धारकांनी, २०१५ च्या उक्त नियमांमध्ये विहित केलेल्या वेळेच्या आत, शासनाच्या विविध विभागांकडून आणि जिल्हा शासकीय कार्यालयांकडून तसेच विविध स्थानिक प्राधिकरणांकडून विविध परवानग्या व विविध ना-हरकत प्रमाणपत्रे (एनओसी) मिळविणे आवश्यक आहे. जर बोलीदारांनी विहित केलेल्या उक्त वेळेच्या आत, त्याची पूर्तता केली नाही तर, वाटप केलेल्या प्रमुख खनिज खंडाचा पुन्हा लिलाव करणे आवश्यक असते.

३. सध्या, एकात्मिक प्रशासकीय यंत्रणेच्या अभावामुळे खनिज प्रकल्प जलद गतीने कार्यान्वित करण्यात अडथळा निर्माण होत होता. म्हणून, खाणकाम कार्यांना जलद गतीने मान्यता देण्यासाठी आणि पोलाद व सिमेंट यांसारख्या खनिज आधारित उद्योगांच्या वाढीस चालना देण्यासाठी, मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली संबंधित शासकीय विभागांचे काही मंत्री व सचिव यांचा समावेश असलेल्या एकीकृत प्राधिकरणाची स्थापना करण्याची गरज आहे असे वाटले, ज्यामुळे, गडचिरोली जिल्ह्याच्या आणि परिणामी, राज्याच्या सर्वांगीण विकासास चालना मिळेल. मान्यता दिलेल्या खाणपट्ट्यांच्या कार्यान्वयनाच्या प्रक्रियेला गती देण्यामध्ये, प्राधिकरण उत्प्रेरक म्हणून काम करील. त्यामुळे, उक्त क्षेत्रात रोजगार निर्मिती देखील होईल आणि राज्याच्या महसुलात वाढ होईल.

४. कायद्याची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :-

(एक) गडचिरोली जिल्ह्यात प्रमुख व विनिर्दिष्ट गौण खनिजे सापडत असल्याने अशा दोन्ही खनिजांचा सुरळीतपणे व जलदगतीने पद्धतशीर विकास करण्यासाठी, राज्यामध्ये गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण स्थापन करणे ;

(दोन) पर्यावरण सुरक्षेची व वैधानिक अनुपालनाची सुनिश्चिती करून, गडचिरोली जिल्ह्यातील खाणकाम कार्ये जलदगतीने करण्याच्या दृष्टीने, प्राधिकरणाची उद्दिष्टे, अधिकार व कार्ये यांसाठी तरतूद करणे ;

(तीन) प्राधिकरणाचे काम सुलभतेने करण्यासाठी, कार्यकारी समिती घटित करण्याकरिता आणि तिचे अधिकार व कार्ये यांसाठी तरतूद करणे ;

(चार) प्राधिकरण व कार्यकारी समिती, अधिकारांचा वापर करताना व कार्ये पार पाडताना खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७ आणि त्याअन्वये केलेले नियम यांच्या तरतुदींचे अनुपालन करण्याची तरतूद करणे ;

(पाच) शासकीय कार्यालयांकडून किंवा इतर संबंधित प्राधिकरणांकडून कोणतेही विवरण, लेखा विवरणपत्र, अहवाल, सांख्यिकी किंवा इतर माहिती मागविण्यासाठी, प्राधिकरणाला व कार्यकारी समितीला अधिकार प्रदान करणे.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी कायदा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, म्हणून, त्यांनी दिनांक २ जून २०२५ रोजी गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण अध्यादेश, २०२५ हा, प्रख्यापित केला होता.

६. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **शंभूराज देसाई,**

दिनांक २३ जून, २०२५. खनिकर्म मंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :–

**खंड ३.–** या खंडान्वये, गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे स्थापन करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ८ (ट).–** या खंडान्वये, प्राधिकरणाचे इतर कोणतेही अधिकार व कार्ये, नियमाद्वारे विहित करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १७ (१).–** या खंडान्वये, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १८.–** या खंडान्वये, या अधिनियमाशी व त्याखाली केलेल्या नियमांशी सुसंगत असलेले विनियम करण्याचा अधिकार, प्राधिकरणाकडे घेण्यात आला आहे.

**खंड १९ (१).–** या खंडान्वये, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे ती अडचण दूर करण्याचा अधिकार, राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर उल्लेखिलेले प्रस्ताव, हे सामान्य स्वरुपाचे आहेत.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६५.]**

**[गडचिरोली जिल्ह्यातील खनिजयुक्त क्षेत्रांच्या सुव्यवस्थित व जलद विकासाचे सुसूत्रीकरण व पर्यवेक्षण करण्याच्या आणि अशा विकासासाठी परियोजना, प्रकल्प व योजना राबविण्याच्या प्रयोजनांसाठी गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरणाची स्थापना करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. शंभूराज देसाई,**
खनिकर्म मंत्री.**]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.